प्रेसनोट दिनांक – ०५/०१/२०२३.

प्रभाग समिती क्र.४, उल्हासनगर महानगरपालिका, जिल्हा ठाणे येथील २ मुकादम यांना लाचेची रक्कम स्विकारताना ॲण्टी करप्शन ब्युरो ठाणे विभागाने घेतले ताब्यात.

| अक्र | घटक | ला.प्र.वि.ठाणे |
|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे गुन्हा नोंद कमांक | विठ्ठलवाडी पोलीस ठाणे ०४/२०२३ ला.प्र.का. सन १९८८ चे ( संशोधन २०१८) चे कलम ७ प्रमाणे. |
| २ | लोकसेवकाचे नांव व कार्यालय | १. श्री. वसंत कृष्णा फुलोरे, वय ५५वर्षे, मुकादम, प्रभाग समिती क्र.३, उल्हासनगर महानगरपालिका, जिल्हा ठाणे.<br>२. श्री. बाजीराव दामोदर बनकर, वय ५९ वर्षे, मुकादम, प्रभाग समिती क्र.३,उल्हासनगर महानगरपालिका,ठाणे. |
| ३ | मागीतलेली लाचेची रक्कम | ५,०००/– रूपये |
| ४ | स्विकारलेली रक्कम | ४,०००/– रूपये |
| ५ | थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार हे राहत असलेल्या ठिकाणी त्यांचे नातेवाईकांचे घराचे दुरूस्तीचे काम करीत असतांना सदरचे काम उल्हासनगर प्रभाग समिती ३ च्या अंतर्गत येत असल्याने तेथील लोकसेवक यांनी तक्रारदार यांना सदरचे काम सुरू ठेवायचे असल्यास ५०००/–रुपये लाचेची मागणी केली होती.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ०४/०१/२०२३ रोजी पडताळणी केली असता वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने ॲण्टी करप्शन ब्युरो ठाणे युनीटने सापळयाचे आयोजन करून दिनांक ०४/०१/२०२३ रोजी लोकसेवक वसंत कृष्णा फुलोरे व बाजीराव दामोदर बनकर यांना तक्रारदार यांचेकडुन ४०००/– रुपये लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. |

**मार्गदर्शन अधिकारी**

मा.श्री.सुनील लोखंडे, पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि.ठाणे, परिक्षेत्र ठाणे.

मा.श्री.अनिल घेरडीकर, अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि.ठाणे, परिक्षेत्र ठाणे.

ला.प्र.वि. विभागामार्फत नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रटाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवका विरूध्द तक्रार असल्यास ला.प्र.वि. ठाणे, परिक्षेत्र ठाणे कार्यालय यांचेशी संपर्क करावा.

संपर्काचा पत्ता ला.प्र.वि.ठाणे कार्यालय, मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे ( प.) ४००६०१

संकेत स्थळ – acbmaharashtra@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार – spacbthane@mahapolice.gov.in

ॲप्लीकेशन – acbmaharashtra.net

टोल फ्री नंबर – १०६४

दुरध्वनी क्र. – ०२२/२०८१३५९८/२०८१३५९९

व्हाट्सॲप तक्रार क्र.९९३०९९७७००

पोलीस निरीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

(संतोष अंबिके)
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे